# प्रेसनोट

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरण दिनाच्या दिवशी महानगर पालिकेकडून झाडाची कत्तल केली याबाबतची बातमी वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली आहे. याबाबतचा खुलासा पुढील प्रमाणे सादर करण्यात येत आहे. सदरचे झाड काशिमीरा येथिल जरीमरी गार्डन समोरचा रोड,मिरारोड (पु.) रस्त्यावरील झाड असून सदर झाड पोकळ झालेले होते व झाड धोकादायकरित्या झुकलेले होते. सदर झाडाची पाहणी करुन वृत्तपत्रात नोटीस प्रसिध्द करून उपरोक्त झाड मुळासहीत काढणेबाबत नागरिकांच्या सुचना/हरकती मागविल्या होत्या. विहित कालावधीत एकही हरकत सूचना प्राप्त नव्हती. पावसाळा सुरू होणार असल्यामुळे जोराच्या वाऱ्याने/पावसाने सदर झाड उन्मळून पडण्याची शक्यता होती. त्यामुळे जिवित व वित्तहानी होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून विहित प्रक्रिया पूर्ण करून सदर झाड तातडीने काढण्यात आलेले आहे.

तसेच ५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदान येथे मा.आयुक्त सो. यांच्या हस्ते १५ रोपांची लागवड करण्यात आली आहे तसेच भाईदर (प.) सत्संग रोड व इतर ठिकाणी असे एकूण ५५ नग रोपांची लागवड करण्यात आलेली आहे. तसेच पावसाळयाच्या कालावधीत मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात एक लाख वृक्षरोपण करण्याचे उद्दीष्ट आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी कटीबध्द असून त्याअनुषंगाने पालिकेमार्फत अनेक उपायायोजना केल्या जात आहेत.

(कल्पिता पिंपळे)
उपायुक्त (उदयान)
मिरा भाईंदर महानगरपालिका


मिरा भाईंदर महानगरपालिका


पर्यावरण


जागतिक
पर्यावरण